| MHKO110013832021 | दाखल दिनांक | - | ०७/०९/२०२१ | | |
|---|---|---|---|---|---|
| | नोंद दिनांक | - | ०९/०९/२०२१ | | |
| | निकाल दिनांक | - | १०/०३/२०२६ | | |
| | कालावधी | - | वर्ष | महीने | दिवस |
| | | | ०४ | ०६ | ०४ |

## प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, पेठवडगाव यांचे न्यायालयात

## (पिठासिन अधिकारी - श्रीमती. आर. एस. मोरे)

**नियमित फौजदारी खटला क्र. १८२/२०२१**
**नि. क्र. / बी**

| | |
|---|---|
| **अभियोग पक्ष** | **महाराष्ट्र शासन** तर्फे पोलीस ठाणे अधिकारी, वडगांव पोलीस ठाणे, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर |
| **अभियोग पक्षातर्फे विधिज्ञ** | श्री. व्ही. पी. कुसुरकर, सहा. सरकारी अभियोक्ता. |
| **आरोपी** | **१. प्रकाश पांडुरंग नाईक**<br>व.व.३३, धंदा - शेती,<br>रा. किणी,<br>ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर.<br>**२. कविता दिपक जाधव,**<br>व.व.२९, धंदा - शेती,<br>रा. सदर. |
| **आरोपी तर्फे विधिज्ञ** | श्रीमती एस. ए. महाडीक |

**भाग–ब**

(फौजदारी आदेशिकाचे प्रकरण VI मधील परिच्छेद ४४ (ii) अन्वये)

| | |
|---|---|
| गुन्हा घडलेचा दिनांक | १७/०३/२०२१ |

| | |
|---|---|
| गुन्हा रजिस्टर क्रमांक | १५१/२०२१ |
| दोषारोपपत्र दाखल दिनांक | ०७/०९/२०२१ |
| दोषारोप ठेवलेचा दिनांक | ०१/१०/२०२५ |
| साक्षीपुरावा सुरु झालेचा दिनांक | २४/०२/२०२६ |
| न्यायनिर्णयासाठी प्रकरण राखून ठेवल्याचा दिनांक | १०/०३/२०२६ |
| न्यायनिर्णय दिनांक | १०/०३/२०२६ |
| दोषसिध्दी व शिक्षेबाबत आदेश | अंतिम आदेशाप्रमाणे |

## आरोपींविषयी माहिती

| अनु. क्र. | आरोपीचे नांव | आरोपीस अटक दिनांक | आरोपीस जामिनावर खुले केलेचा दिनांक | दोषारोपा- तील कलम | आरोपीस दोषमुक्त किंवा दोषसिध्द केले | आरोपीस झालेली शिक्षा |
|---|---|---|---|---|---|---|
| **१.** | **प्रकाश पांडुरंग नाईक** | आरोपी यांना सी.आर.पी.सी ४१ अ प्रमाणे नोटीस दिली | आरोपी यांना सी.आर.पी.सी ४१ अ प्रमाणे नोटीस दिली | भा.दं.वि.सं. कलम ३२४,३२३ सह कलम ३४ अन्वये | निर्दोष मुक्तता | --- |
| **२.** | **कविता दिपक जाधव** | वरीलप्रमाणे | वरीलप्रमाणे | वरीलप्रमाणे | वरीलप्रमाणे | --- |

# न्यायनिर्णय

( आज दिनांक १० मार्च, २०२६ रोजी घोषित )

आरोपी क्र. १ व २ यांच्यावर भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम ३२४, ३२३ सह कलम ३४ अन्वये गुन्हा केल्याबाबत दोषारोप आहे.

## अभियोग पक्षाची हकिकत थोडक्यात खालीलप्रमाणे -

**०२.** फिर्यादी माधुरी प्रकाश नाईक हे रामोशी गल्ली, किणी, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर येथील रहिवासी आहेत. दि. १७/०३/२०२१ रोजी रात्री ११.०० वाजणेचे सुमारास

फिर्यादीच्या राहत्या घरात आरोपी क्र. २ यांनी फिर्यादी यांना तोंडावर व छातीवर हाताने मारहाण केली व आरोपी क्र. १ ने लोखंडी धारदार खुरप्याने फिर्यादीच्या डाव्या हाताच्या अंगठया जवळच्या बोटाला मारून दुखापत करून जखमी केले. त्यानंतर फिर्यादी यांनी वडगांव पोलीस ठाण्यात जाऊन आरोपीच्या विरोधात तक्रार दाखल केली.

**०३.** सदर फिर्यादला अनुसरून आरोपीविरुद्ध वडगांव पोलीस ठाणे येथे गुन्हा रजि. क्र. १५१/२०२१ असा नोंद झाला. गुन्ह्याचा तपास जी. के. घोडके – पोलीस हे. कॉ. यांचेकडे सोपविण्यात आला. तपासी अधिकारी यांनी संबंधीत साक्षीदारांचे बयान नोंदवून घेतले, घटनास्थळाचा पंचनामा केला व जखमीचे प्रमाणपत्र प्राप्त केले. आरोपींविरुद्ध पुरेसा पुरावा मिळून आल्यामुळे त्यांनी आरोपींविरुद्ध फौजदारी प्रक्रिया संहिता कलम १७३ प्रमाणे दोषारोपपत्र सादर केले.

**०४.** आरोपी हजर झाले असता **निशाणी क्र.०७** वर आरोपी वर भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम ३२४, ३२३ सह कलम ३४ अन्वये दोषारोप ठेवण्यात आला. सदर दोषारोप आरोपींना मातृभाषेत वाचून व समजावून सांगण्यात आले. आरोपींनी त्यांच्यावरील आरोप नाकारून खटल्याची संपरिक्षा घेण्याची मागणी केली.

**०५.** अभियोग पक्षाने सदर प्रकरणात साक्षीदार क्र.१ - माधुरी प्रकाश नाईक, यांची साक्ष **निशाणी क्र.२०** वर नोंदवली आहे. अभियोग पक्षाने आपली भिस्त दि. १७.०३.२०२१ च्या जबाबावरची फिर्यादीची सही **- निशाणी क्र. २१** कागदोपत्री पुराव्यावर ठेवली. आरोपींविरुद्ध कोणताही आक्षेपार्ह पुरावा अभिलेखावर न आल्यामुळे आरोपींचे फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ अन्वयेचे निवेदन नोंदवण्यात आले नाही. **निशाणी १९** च्या पुरसिस नुसार फिर्यादी व आरोपी यांचेदरम्यान तडजोड झालेली असून फिर्यादी यांची आरोपींविरूध्द कोणत्याही प्रकारची तक्रार राहीली नाही व फिर्यादी यांना सदरची केस पुढे चालवायची नाही. त्यामुळे **निशाणी २०** च्या पुरसिस नुसार फिर्यादी यांना आरोपी विरूध्द कोणताही लेखी अथवा तोंडी पुरावा देणेचा नसल्याचे कथन केले. सदरची केस मध्ये नि. १ च्या आदेशानुसार अभियोग पक्षाचे पुरावे बंद करण्यात आले.

**०६.** अभियोग पक्षाचे विद्वान सहा. सरकारी अभियोक्ता श्री. व्ही. पी. कुसुरकर व आरोपींचे विद्वान विधिज्ञ श्रीमती. एस. ए. महाडीक यांचा युक्तिवाद ऐकला.

**०७.** दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकून व अभिलेखावर आलेल्या पुराव्याचे अवलोकन केल्यानंतर माझे विवेचनाकरीता खालील मुद्दे उपस्थित झाले. त्या कामी कारणमीमांसेसह निष्कर्ष खालील प्रमाणे नोंदवले आहेत.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष.** |
|---|---|---|
| १. | दि. १७/०३/२०२१ रोजी रात्री ११.०० वाजणेचे सुमारास रामोशी गल्ली, किणी, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर येथे फिर्यादी यांचे राहते घरी आरोपींनी आपसात संगनगत करून लोखंडी खुरप्याने फिर्यादी माधुरी नाईक यांच्या डाव्या हाताच्या अंगठयाजवळ मारहाण करून ईच्छापुर्वक दुखापत केली, असे अभियोग पक्षाने सिद्ध केले आहे काय ? | **नकारार्थी.** |
| २. | अभियोग पक्षाने हे सिद्ध केले आहे काय की, उपरोक्त नमूद दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपींनी संगनमताने फिर्यादीस हाताने व लोखंडी खुरप्याने मारहाण करून इच्छापुर्वक दुखापत केली ? | **नकारार्थी.** |
| ३. | आदेश काय ? | **अंतिम आदेशाप्रमाणे.** |

# <u>कारणमिमांसा</u>

## **मुद्दा क्र.१ व २ करिता** -

**०८.** मुद्दा क्र.१ व २ हे एकमेकांशी निगडित असल्याने त्यांच्या कारणांची पुनरावृत्ती टाळण्याकरिता सदर मुद्दे विवेचनाकरीता एकत्रित विचारात घेण्यात आलेले आहेत.

**०९.** अभियोग पक्षाच्या पुराव्याचे विवेचन करण्यापूर्वी या ठिकाणी हे नमूद करणे न्यायोचित ठरेल की, बचाव पक्षाच्या वकिलांनी घटनास्थळ पंचनामा - **निशाणी क्र. २५** व जखमीचे वैदयकीय प्रमाणपत्र - **निशाणी क्र. २६** मान्य केले आहेत.

**१०.** अभियोग पक्षाने तपासलेल्या साक्षीदार क्र १ - माधुरी प्रकाश नाईक

(अ.सा.क्र.१), यांनी त्यांच्या मौखिक पुराव्यादरम्यान असे नमूद केले आहे की, दि. १६/०३/२०२१ आणि १७/०३/२०२१ रोजी काय घटना घडली हे त्यांना माहित नाही. त्या दिवशी आरोपी क्र. १ व २ यांनी त्यांना मारले किंवा कसे हे फिर्यादी यांना माहीत नसल्याचे कथन केले. आरोपी क्र. १ व आरोपी क्र. २ यांच्यामध्ये प्रेम संबंध होते किंवा कसे हे त्यांना माहित नाही. फिर्यादी यांना दि. १७/०३/२०२१ रोजीचा जबाब दाखविण्यात आला. त्यावर त्यांची सही असल्याचे त्यांनी मान्य केले. परंतु, त्यातील मजकूरा बाबत त्यांना माहित नाही. आरोपी व फिर्यादी यांच्यामध्ये कोर्टाबाहेर तडजोड झाली असल्याचे त्यांनी कथन केले.

**११.** प्रस्तुत प्रकरणातील पुराव्याचे बारकाईने अवलोकन केले असता असे दिसून येते की, खटल्यातील मूळ फिर्यादी साक्षीदार यांनी त्यांच्या मौखिक पुराव्यामध्ये आरोपींनी मारहाण केली किंवा कशी हे त्यांना माहीत नसल्याचे कथन केले. तसेच अभियोग पक्षाच्या वकिलांमार्फत विचारण्यात आलेल्या उत्तरसुचक प्रश्नांना सदर साक्षीदार यांनी नकारार्थी उत्तरे दिली असून त्याने आरोपींविरुद्ध कोणतीही दोष सिद्ध होतील अशी विधाने केली नाहीत. त्यामुळे अभियोग पक्षास सहकार्य होईल अशी कोणतीही महत्त्वाची कबुली सरकारी वकील सदर साक्षीदाराच्या तोंडून मिळवू शकले नाहीत. यावरून फिर्यादी व आरोपी यांच्यामध्ये घडलेल्या घटनेबाबत संशय निर्माण होत आहे. तसेच प्रस्तुत कामातील मूळ फिर्यादी व आरोपी यांनी **निशाणी क्र. १९** वर तडजोड पुरसिस दाखल करून त्यांच्यामध्ये न्यायालयाबाहेर तडजोड झाली असल्याचे सांगितले आहे. फिर्यादी यांची आरोपी विरूध्द कोणत्याही प्रकारची तक्रार राहीलेली नसल्याचे त्यांनी कथन केले. तसेच **निशाणी क्र. २०** च्या पुरसीस नुसार फिर्यादी यांना कोणताही लेखी अथवा तोंडी पुरावा देणेचा नाही.

**१२.** अभियोग पक्षातर्फे तपासण्यात आलेल्या साक्षीदाराच्या साक्षी पुराव्याचे अवलोकन करता, दि. १७/०३/२०२१ रोजी रात्री ११.०० वाजणेचे सुमारास फिर्यादीच्या राहत्या घरात आरोपी क्र. २ यांनी फिर्यादी यांना तोंडावर व छातीवर हाताने मारहाण केली व आरोपी क्र. १ ने लोखंडी धारदार खुरप्याने फिर्यादीच्या डाव्या हाताच्या अंगठया जवळच्या बोटाला मारून दुखापत करून जखमी केले, हे अभियोग पक्षाने निःसंशय सबळ पुराव्यानिशी शाबीत केलेले नाही. आरोपीने घटनास्थळाचा पंचनामा व जखमीचे वैदयकीय प्रमाणपत्र मान्य केले असले तरी आरोपी व फिर्यादी यांच्यामध्ये तडजोड झाल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे सरकार पक्षाच्या कथनास पुरेसे बळ मिळत नाही व सरकार पक्षाच्या कथनाबद्दल संशय उत्पन्न

होतो व संशयाचा फायदा मिळण्याकरिता आरोपी हा पात्र आहे. अभियोग पक्षाने सदरचा गुन्हा निःसंशय सबळ पुराव्यानिशी शाबीत केलेले नाही, त्यामुळे मी मुद्दा क्र.१ व २ चे निष्कर्ष नकारार्थी नोंदवत आहे.

**<u>मुद्दा क्र.०३ करिता</u>** -

**१३.** मुद्दा क्र.१ व २ करिता मी माझे निष्कर्ष नकारात्मक नोंदवलेले आहेत. आरोपींवरील आरोप अभियोग पक्षाने रास्त संशयापलीकडे सिद्ध केलेले नाहीत. त्यामुळे आरोपी संशयाचा फायदा मिळण्यास पात्र आहेत. आरोपींविरुध्द सबळ पुरावा न आल्याने आरोपीची वर नमुद गुन्हयातून निर्दोष मुक्तता करणे न्यायोचित वाटते. सबब, मुद्दा क्र.०३ चे निष्कर्षाकरिता मी खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

# आदेश

| | |
|---|---|
| १. | फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम २४८(१) अन्वये आरोपी **१. प्रकाश पांडुरंग नाईक व आरोपी क्र. २. कविता दिपक जाधव,** यांची भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम ३२४,३२३ सह कलम ३४ मधील गुन्ह्यातून निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे. |
| २. | आरोपीचे बंधपत्र व जामीनकतबा रद्द करण्यात येत आहे. |
| ३. | आरोपी यांना असे निर्देशित करण्यात येते की, फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७-अ अन्वये या न्यायालयाचे न्यायनिर्णयाविरुध्द वरिष्ठ न्यायालयात अपील अथवा अर्ज दाखल झाल्यास त्यांच्यासमोर हजर रहाण्याकरिता सहा महिन्यांच्या कालावधीकरिता त्यांनी रक्कम रु.१५,०००/- रकमेचा वैयक्तिक जामीन द्यावा. |
| ४. | प्रस्तुत प्रकरणामध्ये जप्त करण्यात आलेला मुद्देमाल म्हणजे एक लोखंडी खुरपे हे अपील कालावधीनंतर जिल्हाधिकारी कोल्हापूर यांचेकडे नियमाप्रमाणे नाश करण्यासाठी पाठविण्यात यावे. |

| | |
|---|---|
| ५. | सदर निकालाची एक प्रत माहितीकरिता मा. जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांचेकडे पाठविणेत यावी. |

( खुल्या न्यायालयात जाहीर व उदघोषित करण्यात आला.)

**sd/-**

**पेठ-वडगांव** **( आर.एस.मोरे )**
**दिनांक – १०/०३/२०२६.** **प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, पेठ-वडगांव**

## भाग–क

(फौजदारी आदेशिकाचे प्रकरण VI मधील परिच्छेद ४४ (iii) अन्वये)

## अभियोग पक्षातर्फे घेतलेल्या साक्षीदारांची यादी

| अ.क्र. | साक्षीदाराचे नांव | निशाणी क्रमांक | साक्षीदाराचे स्वरुप |
|---|---|---|---|
| अ.सा.क्र.१ | माधुरी प्रकाश नाईक उर्फ माधुरी प्रशांत जाधव | २० | फिर्यादी |

## अभियोग पक्षातर्फे सिध्द केलेले दस्तऐवज

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | तपशिल |
|---|---|---|
| १ | अ.नि.क्र. २१/ अ.सा.क्र.१ | दि. १७.०३.२०२१ च्या जबाबावरची फिर्यादीची सही |

## आरोपी पक्षातर्फे मान्य केलेले दस्तऐवज

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | तपशिल |
|---|---|---|
| १ | **निशाणी क्र. २५** | घटनास्थळ पंचनामा |
| २ | **निशाणी क्र. २६** | जखमीचे वैदयकीय प्रमाणपत्र |

**sd/-**

**पेठ-वडगांव** **( आर.एस.मोरे )**
**दिनांक – १०/०३/२०२६.** **प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, पेठ-वडगांव**